भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना

निधी मागणी व वितरण व्यवस्था योजनेच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती (सोशल ऑडिट)

काय आहे अमृत आहार योजना?

योजना सुरू करण्याची कारणे

- आदिवासी समाजामध्ये आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त.
- आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजन वाढीचे प्रमाण कमी, परिणामी कमी वजनाच्या बालकांचा जन्म.
- बाळंतपणानंतर बालकाच्या योग्य वाढीसाठी पहिले सहा महिने मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणे आवश्यक.
- अपुरा आहार व गरोदरपणात घ्यावयाची काळजी याबाबत आदिवासी समाजामध्ये कमी जागरूकता.
- अपुऱ्या उष्मांक व प्रथिनांमुळे आदिवासी भागातील बालकांच्या वाढीवर वाईट परिणाम.
- रक्तपांढरी, वाढ खुरटणे (स्टंटिंग), उंचीच्या प्रमाणात कमी वजन (वेस्टिंग), कमी वजन (अंडरवेट) असे प्रकार होऊन ही बालके कुपोषित.

कोणाला काय दिले जाते या योजनेमध्ये?

- गरोदर स्त्रिया व ६ महिन्यापर्यंतच्या स्तन्यदा मातांना शिजवलेला ताजा चौरस आहार आठवड्यातून पाच दिवस देणे.
- ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडे किंवा केळी देणे.

कुठे आणि कशी राबवली जाते?

१ डिसेंबर २०१५ पासून	महाराष्ट्रातील आदिवासी १६ जिल्हे	त्यातील एकूण ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्प

योजना आदिवासी विकास विभागाची असली तरी त्याची अंमलबजावणी महिला व बालविकास विभागातील एकात्मिक बालविकास योजनेमार्फत अंगणवाडीमधून केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर, फक्त महाराष्ट्रात सुरू असलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी प्रभावी पद्धतीने व्हायची

असेल तर योजनेच्या अंमलबजावणीसाठीचे विविध पैलू आणि त्या संदर्भातील अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी प्रयत्न केला गेला.

अमृत आहार योजनेतील विविध पैलू आणि त्याची सद्यःस्थिती पाहण्यासाठी घडवलेल्या प्रक्रिया

- योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या निधीची मागणी व वितरण यंत्रणा
- योजनेच्या अंमलबजावणीवरील सनियंत्रण व देखरेखीची यंत्रणा
- गावपातळीवर प्रत्यक्ष राबविण्यात येणाऱ्या योजनेची सद्यःस्थिती, अडचणी
- योजनेची अंमलबजावणी सुधारण्यासाठी विविध घटकांनी सुचवलेले उपाय

या पैलूंची सद्यःस्थिती समजून घेऊन त्यावर काम करण्यासाठी खालील प्रक्रिया राबविण्यात आल्यात-

अ) अमृत आहार योजनेस मिळणाऱ्या निधीच्या मागणी व वितरण यंत्रणेचे दस्तऐवजीकरण

आ) गावपातळीवर प्रत्यक्ष राबवण्यात येणाऱ्या योजनेची सद्यःस्थिती समजण्यासाठी 'सोशल ऑडिट' प्रक्रिया

या दोन्ही प्रक्रियांमधून पुढे आलेले मुद्दे आणि सूचनांचे एकत्रित विश्लेषण करून गाव ते राज्य अशा विविध स्तरांवर योजनेची अंमलबजावणी आणि निर्णय घेणाऱ्या शासकीय यंत्रणेबरोबर वकालत करण्याचा मुख्य हेतू होता.

हे सर्व करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात आरोग्य सेवा आणि पोषण हक्कावर काम करीत असलेल्या 'साथी' संस्थेने पुढाकार घेतला. त्याचबरोबरीने या प्रक्रिया प्रत्यक्ष घडवून आणण्यासाठी स्थानिक संस्था-संघटना यांचे सहयोग घेण्यात आले.

कुठे आणि कुणाच्या सहयोगाने प्रक्रिया घडवून आणली?

गडचिरोली, ठाणे, रायगड जिल्ह्यांमधील तालुके-

तालुका	लोकसंख्या	अंगणवाडी संख्या	मिनी अंगणवाडी संख्या	एकूण अंगणवाडी संख्या
कोरची, गडचिरोली	४२,०००	१५०	५०	२००
मुरबाड, ठाणे	६७,३४०	३६६	४०	४०६
कर्जत, रायगड	२,००,०००	२७८	५८	३३६

(मे २०१९ च्या ICDSMIS आकडेवारीनुसार)

गडचिरोली जिल्हा

ठाणे जिल्हा

रायगड जिल्हा

कोरची, मुरबाड, कर्जत तालुक्यातील पोषण आणि आरोग्यासंदर्भातील आकडेवारी

संख्या	कोरची तालुका	मुरबाड तालुका	कर्जत तालुका
▪ ६ ते ३५ महिने या कालावधीतील एकूण बालकांची संख्या	१९०६	६२७६	५७१२
▪ ३७ ते ७१ महिने या कालावधीतील एकूण बालकांची संख्या	२०५०	९१२७	४८५६
▪ गर्भवती महिलांची संख्या	३६७	११६४	१०९६
▪ स्तन्यदा मातांची संख्या	३८६	११४६	११९४
पोषणासंदर्भातील आकडेवारी			
▪ वजन घेतलेल्या एकूण मुलांची संख्या	३७८८	१४२१५	१४४९५
▪ सामान्य श्रेणीतील मुलांची संख्या	२७२८	१२८११	१३११६
▪ काही प्रमाणात कमी वजन असलेल्या मुलांची संख्या	७९८	१२०१	११२०
▪ गंभीर प्रमाणात कमी वजन असलेल्या मुलांची संख्या	२६२	२०३	२५९

(मे, २०१९ च्या ICDS-MIS नुसार)

या तीन जिल्ह्यात आणि तालुक्यात गेली अनेक वर्षे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था- **मुरबाड,** ठाणे जिल्ह्यात **'वन-निकेतन'** संस्था; **कोरची,** गडचिरोली जिल्ह्यामधील **'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'**; **कर्जत,** रायगड जिल्ह्यातील **'दिशा केंद्र'** यांच्या सहयोगाने प्रक्रिया राबविण्यात आली.

अ) 'अमृत आहार योजने'स मिळणाऱ्या निधीच्या मागणी व वितरण यंत्रणेची दस्तऐवजीकरण प्रक्रिया

राज्य ते अंगणवाडी पातळीवर अमृत आहार योजनेची निधी वितरणाची व मागणीची व्यवस्था काय आहे? या योजनेचे सनियंत्रण व अंमलबजावणी कशी होते? अंमलबजावणी होत असताना येणाऱ्या अडचणी, त्या सुधारण्यासाठी अंगणवाडी सेविका व स्थानिक ते राज्य स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या नेमक्या सूचना काय आहेत? या दृष्टीने दस्तऐवजीकरण करणे व त्यातून पुढे आलेल्या शिफारशी राज्य पातळीवर मांडणे. या उद्देशाने रायगड, ठाणे आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचा अभ्यास करण्यात आला.

राज्य ते गाव पातळीवर कोणा-कोणाकडून माहिती घेण्यात आली.



या पद्धतीने गोळा केलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले...

9. काय आहे सध्याची अमृत आहार योजना निधी मागणी-वितरण यंत्रणा?

महाराष्ट्रात सध्या वर दिल्याप्रमाणे अमृत आहार योजनेच्या निधीची मागणी यंत्रणा उभारली गेली आहे.

मागणी यंत्रणा समजून घेताना पुढे आलेले मुद्दे-

मागणी करण्यासाठी लाभार्थींची संख्या आणि त्यावर केलेल्या खर्चाचा हिशोब चोख ठेवणे महत्त्वाचे आहे. पण तिन्ही जिल्ह्यात हिशोब ठेवण्यासाठी अंगणवाडी सेविकांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. ते नियमितपणे करत राहणे आवश्यक आहे असे अंगणवाडी सेविकांनी मांडले आहे.

मागणी पत्रकाचा आराखडा जिल्हा पातळीवरून देण्यात आला असून प्रत्येक महिन्याला निधीची मागणी अंगणवाडी सेविकेने करणे अपेक्षित आहे. पण कोरची तालुका सोडला तर बाकीच्या दोन्ही तालुक्यात दरमहा मागणी पत्रक भरले जात नाही. यामागचे कारण विचारले असता, अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षकांनी असे सांगितले की, 'मागणी पत्रकाच्या आराखड्याच्या झेरॉक्सचा खर्च दरवेळेस सेविकेला करावा लागतो. जरी नियमित मागणी केली तरी वरून वेळेवर निधी येत नसल्याने नुसते मागणीपत्रक देऊन काही उपयोग होत नाही.

याचबरोबरीने राज्य ते गाव अशा विविध स्तरांवर

निधीच्या वितरणाची यंत्रणा काय आहे? हे समजून घेताना आम्हाला लक्षात आले की, वितरणाच्या दोन प्रकारच्या व्यवस्था कार्यरत आहेत त्या पुढीलप्रमाणे...

वर दाखविण्यात आलेली वितरण व्यवस्था ही नियमित आणि सार्वत्रिक यंत्रणा म्हणून महाराष्ट्रात कार्यरत आहेत. ही यंत्रणा राबविताना निधीची मागणी वेळेत आणि जास्तीत जास्त अचूक जाणे गरजेचे असते. तसे झाले तर या यंत्रणेमध्ये निधी वितरित करण्यास जास्त उशीर होत नाही असे अधिकारी-कर्मचारी यांनी सांगितले.

वर दिलेल्या माहितीनुसार, अमृत आहार योजनेचा निधी कमी पडला किंवा राज्यावरून यायला उशीर झाला तर जिल्हाधिकारी त्यांच्या पातळीवर निधी उभारू शकतात आणि योजना सुरळीत चालू ठेवू शकतात. पण या व्यवस्थेमध्ये निधी वितरणासाठीचे टप्पे आणि स्तर जास्त आहेत. या व्यवस्थेमध्ये आधी बिले सादर करावी लागतात आणि मगच निधी वितरित केला जातो. या व्यवस्थेमध्ये आगाऊ रक्कम देण्याची कोणतीच पद्धत नाही. त्यामुळे या प्रकारच्या व्यवस्थेमध्ये निधी वितरणाला नेहमीच उशीर होतो असे अधिकारी-कर्मचारी यांनी सांगितले आहे.

या दोन्ही यंत्रणा लक्षात घेतल्या तर या यंत्रणेतील वितरणाचे काही स्तर आणि टप्पे आपण नक्कीच कमी करू शकतो आणि तसे करण्याचा यशस्वी प्रयत्न गडचिरोली जिल्ह्यामध्ये केला गेला आहे.

गडचिरोली जिल्हा अमृत आहार योजनेच्या निधी मागणी आणि वितरण व्यवस्थेमध्ये अग्रेसर! ही व्यवस्था महाराष्ट्रात सार्वत्रिक करण्याची गरज!

योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने व्हायची असेल तर वेळेवर निधी मिळणे हा खूप कळीचा मुद्दा आणि सर्वात महत्त्वाची कडी आहे. आणि हाच मुद्दा लक्षात घेऊन गडचिरोलीमध्ये काही प्रयत्न करण्यात आले. ज्यामध्ये जिल्हाधिकारी यांनी खूप मोठी भूमिका बजावली असून त्यांनी पुढाकार घेऊन अमृत आहार योजनेच्या निधीची जिल्हा पातळीवरील वितरण यंत्रणेमध्ये बदल करून आणखीन सुटसुटीत केली. **जिल्हाधिकारी यांनी केलेल्या सकारात्मक गोष्टी-**

- आर्थिक वर्ष २०१९-२० या काळात जिल्हा नियोजन व विकास समितीकडून एकात्मिक बाल विकास विभागाचे उप-मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निधी वितरित करण्यात आला. निधी थेट अमृत आहार समितीला वितरित केल्यामुळे या वर्षात निधी वितरणात अनियमितता व वेळखाऊपणा झाला नसल्याचे दिसून आले. वितरण करण्याची ही पद्धत योग्य असल्याचे गाव ते जिल्हा पातळीवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मांडले.
- तालुका पातळीवर अंगणवाडी सेविकांच्या मासिक बैठकांमध्ये या योजनेचा आढावा व मागणी पत्र नियमितपणे घेतले जात आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत सीडीपीओ सोबत नियमित स्वरूपात अमृत आहार योजनेची आढावा बैठक घेतली जात असल्याचे दिसून आले. त्यामध्ये झालेल्या खर्चाचा आढावा; पुढील नियोजन आणि अंमलबजावणी, येणाऱ्या अडचणी सोडवण्याचा सतत प्रयत्न केला जातो. जिल्हाधिकारी स्वतः आढावा घेत असल्याने तालुका आणि जिल्हा पातळीवरील संबंधित अधिकारी-कर्मचारी देखील सतर्क राहून काम करत आहेत.

गडचिरोलीच्या उदाहरणावरून आम्ही सरकारला सुचवू इच्छितो की, गडचिरोलीची ही निधी वितरणाची नवीन पद्धत जर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात लागू केली तर अमृत आहार योजनेच्या निधी वितरणातील टप्पे व अडथळे कमी होण्यास निश्चितच मदत होईल. त्यामुळे गाव पातळीवर योजनेची अंमलबजावणी देखील सुकर होईल.

२. योजनेतील निधी वितरणामध्ये कसा आणि किती विलंब होत आहे?

योजनेतील निधी मागणी-वितरण यंत्रणेतल्या अडचणी समजून घेण्यासाठी, आतापर्यंत वेगवेगळ्या पातळ्यांवर योजनेचा किती आणि कधी निधी वितरित झाला हे बघणे गरजेचे होते. म्हणून सन २०१६-१७, २०१७-१८ आणि २०१८-१९ या तीन आर्थिक वर्षात राज्य ते गाव कसा आणि किती निधी वितरित झाला? याची माहिती त्या त्या स्तरावरून गोळा करण्यात आली. या सगळ्या माहितीचे विश्लेषण केले असता पुढील गोष्टी लक्षात आल्या.

१. अपुऱ्या निधीची मागणी

आलेख क्र. १ मध्ये दिल्याप्रमाणे, सन २०१६-१७ आणि २०१७-१८ या आर्थिक वर्षात कोरची, मुरबाड आणि कर्जत या तीन तालुक्यात अमृत आहार योजनेमधील लाभार्थ्यांच्या एकूण संख्येनुसार निधीची मागणी आणि तरतूद होणे अपेक्षित होते. पण तसे कोणत्याच तालुक्यात झालेले दिसत नाही.

आलेख क्र. १

२०१६-१७ मध्ये तालुकावार अपेक्षित बजेट आणि प्रत्यक्ष तरतूद



	कोरची गडचिरोली	मुरबाड ठाणे	कर्जत रायगड
अपेक्षित बजेट	१.३४	१.८९	१.६७
प्रत्यक्ष तरतूद	०.५८	१.०८	०.३६

आलेख क्र. २

२०१८-१९ मध्ये तालुकावार अपेक्षित बजेट आणि प्रत्यक्ष तरतूद



	कोरची, गडचिरोली	मुरबाड, ठाणे	कर्जत, रायगड
अपेक्षित बजेट	२.७५	११.४	४.६१
प्रत्यक्ष तरतूद	०.०	०.८	०.६७

सन २०१६-१७ मध्ये कर्जतमध्ये अपेक्षेपेक्षा सर्वात कमी निधीची तरतूद झालेली दिसते. तालुक्यातील एकूण अमृत आहार योजनेमध्ये येणाऱ्या सर्व गरोदर व स्तन्यदा माता आणि ६ महिने ते ३ वर्षाची सर्व मुले यांच्या संख्येनुसार रु. १.६७ कोटी इतक्या रकमेची तरतूद केली जाणे अपेक्षित होते पण प्रत्यक्षात फक्त ३६ लाख रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली. तर २०१७-१८ मध्ये देखील तसेच झाल्याचे आलेख क्र. २ मधून दिसून येते.

याचा अर्थ असा निघतो की, निधी पुरेशी मागणी केली तरच त्यानुसार निधी वितरित केला जाऊ शकतो. जर निधीची अपुरी मागणी आणि तरतूद केली तर त्याचा परिणाम निधीच्या वितरणावर होऊन प्रत्यक्ष योजना राबवताना निधीचा अभाव निर्माण होतो. त्यामुळे बऱ्याच वेळा अंगणवाडी सेविकांना स्वतःचे पैसे खर्च करून योजना राबवावी लागते. आणि त्यासाठी त्यांना उधारी, उसनवार तर कधीकधी आपले दागिने गहाण ठेवावे लागल्याचे पुढे आले आहे. कर्जतमधील अंगणवाडी सेविकांनी स्वतःचे कमीत कमी रु. ३० हजार ते ९० हजारांपर्यंत पैसे उसने घेतले असून त्यामध्ये त्या योजना राबवीत आहेत.

२. अमृत आहार योजनेचा निधी दुसरीकडे वळवणे

सन २०१७-१८ मधील आहार योजनेच्या निधी संदर्भातील माहिती राज्य सरकारच्या BEAMS (Budget Estimation, Allocation Management System) या वेबसाईटवरून घेऊन त्याचे विश्लेषण केले असता असे दिसून आले की, २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी आदिवासी विकास विभागाने एकूण रु. १२० कोटीची मागणी केली होती. आणि या संपूर्ण मागणीला राज्य पातळीवरून मान्यता मिळून हा निधी खर्च करण्यासाठी उपलब्ध झाला होता. पण दुर्दैवाने रुपये ८७.७९ लाख इतका निधी राज्य सरकारकडून वळवण्यात आल्याचे BEAMS या वेबसाईटवर दिसून आले आहे. तर उरलेल्या ३२.२० कोटी निधीपैकी आदिवासी विकास विभाग फक्त १५ कोटी इतका निधी जिल्ह्यांना वितरित करू शकला आणि वर्षाअखेर एकूण रुपये १३.५९ कोटी इतकाच निधी खर्च झाला. यामागचे कारण राज्यपातळीवरील अधिकाऱ्यांना विचारले आहे.

३. राज्य ते अंगणवाडी यातील प्रत्येक पातळीवर निधी वितरणाला मोठा विलंब

निधीच्या आकडेवारीबरोबर योजेनेचा निधी प्रत्येक पातळीवर कधी वितरित झाला याची माहिती तिन्ही जिल्हे, त्यातील तालुके आणि गावे यातून माहिती गोळा करण्यात आली.

तीन जिल्ह्यातून आलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता, सर्वात जास्त उशीर रायगड जिल्ह्यात झाल्याचे दिसून आले आहे. त्याबद्दलची माहिती पुढीलप्रमाणे-

क्र.	वर्ष	राज्य व जिल्हास्तर	जिल्हा ते तालुकास्तर	गाव/अंगणवाडी आहार समितीस्तर
१.	२०१६-१७	हप्ता १ - नोव्हेंबर	हप्ता २ - नोव्हेंबर	हप्ता २ - एप्रिल
		हप्ता २ - मार्च	हप्ता २ - मार्च	हप्ता २ - डिसेंबर
२.	२०१७-१८	हप्ता १ - जून	हप्ता १ - डिसेंबर	हप्ता १ - एप्रिल
		हप्ता २ - नोव्हेंबर	हप्ता २ - मार्च	हप्ता २ - मे
				हप्ता ३ - जानेवारी
				हप्ता ४ - मार्च
३.	२०१८-१९	हप्ता १ - ऑगस्ट	हप्ता १ - ऑगस्ट	हप्ता १ - मे
		हप्ता २ - ऑक्टोबर	हप्ता २ - ऑक्टोबर	हप्ता २ - ऑक्टोबर
		हप्ता ३ - मार्च	हप्ता ३ - नोव्हेंबर	हप्ता ३ - मार्च
			हप्ता ४ - मार्च	

विश्लेषण

१. **२०१६-१७** या आर्थिक वर्षात राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरून प्रत्येकी दोन वेळा आहार समितीस निधी वितरित करण्यात आला आहे. मात्र आहार समितीस मिळालेल्या दोन्ही निधी वितरण कालावधीमध्ये सात महिन्यांचा विलंब दिसतो.

२. **२०१७-२०१८** या आर्थिक वर्षात जून आणि नोव्हेंबर या महिन्यात निधी तालुका स्तरावर पाठवण्यात आला. गाव स्तरावर पाठवण्यात आलेला निधी एप्रिल, मे, जानेवारी आणि मार्च या महिन्यात वितरित करण्यात आला. या निधी वितरण प्रक्रियेत जून ते डिसेंबर या काळात निधी दिला गेला नाही असे दिसून येते.

३. **२०१८-१९** या आर्थिक वर्षात ऑगस्टनंतर जिल्हास्तरावरून निधीचे वितरण झाले. या महिन्यात निधी तालुकास्तरावर पाठवण्यात आला. गावस्तरावर पाठवण्यात आलेला निधी सरासरी चार महिन्याच्या विलंबाने तीन वेळा दिला गेला. म्हणजे शेवटचा निधी मार्च २०१९ या महिन्यात मिळाल्याचे निदर्शनास आले.

४. वरील तिन्ही वर्षांमध्ये अमृत आहार योजनेच्या शासन निर्णयाप्रमाणे कोणत्याच वर्षी आहार समितीस आगाऊ (Advance) निधी दिलेला नाही.

अशाच पद्धतीने ठाणे आणि गडचिरोली जिल्ह्यात २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षात उशीर झालेला दिसून येतो. पण २०१९-२० मध्ये गडचिरोलीमध्ये निधी वितरणाची यंत्रणा सोपी आणि सुटसुटीत केल्याने उशीर कमी झाल्याचा दिसून आला.

संपूर्ण प्रक्रियेतून पुढे आलेल्या अडचणी आणि योजनेच्या योग्य अंमलबजावणीसाठी आलेल्या सूचना

अंगणवाडी सेविकांना नियमित आणि सततचे प्रशिक्षण देणे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी व निधीचा हिशोब चोख ठेवण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे नियमितपणे प्रशिक्षण करत राहणे आवश्यक आहे; अमृत आहार बनविण्यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीसवर ताण पडतो. त्यामुळे त्या त्यांचे इतर नियमित कामे नीट करू शकत नाही. त्यांच्यावरील हा ताण कमी व्हावा म्हणून शासकीय परिपत्रकानुसार ग्रामसभांनी महिला स्वयंपाकीची नेमणूक करावी. किंवा आहार शिजविण्याचे काम महिला बचत गटांना देण्यात यावे.

रिक्त पदे भरणे.

अंगणवाडी सेविकेचे पद तातडीने भरण्यात यावे; सीडीपीओवर कुरखेडा व कोरची या दोन तालुक्यांचा पदभार असल्याने त्यांना अमृत आहार योजनेची देखरेख करण्यासाठी कार्यक्षेत्रात भेटी देता येत नाही. तसेच १३० गावे असलेल्या कोरची तालुक्यात फक्त चारच अंगणवाडी पर्यवेक्षिका पर्यवेक्षणाचे काम करतात. तरी सीडीपीओ, पर्यवेक्षिका यांची पदे तातडीने भरण्यात यावी.

सक्षम देखरेख आणि समन्वय यंत्रणेची आवश्यकता असणे.

- एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्यात समन्वय वाढल्यास येणाऱ्या अडचणी कमी होऊन योजना अधिक सफल होण्यास मदत होईल.
- अडथळे दूर करण्यासाठी जिल्हा स्तरावर नियमित बैठका घेण्यात याव्यात.
- तालुका पातळीवर एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन विभागांमध्ये समन्वयासाठी नियमित बैठका व दोघांच्या मिळून कार्यक्षेत्रात भेटी होणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत.
- गाभा समिती व नव संजीवनी समितीच्या बैठकीतच अमृत आहार योजनेचा आढावा न घेता जिल्हा सनियंत्रण व अंमलबजावणी समितीच्या नियमित व विशेष बैठका घेऊनच योजनेचा आढावा घेण्यात यावा; या योजनेच्या फलनिष्पत्तीसाठी ग्रामसभांची सहभागिता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे.

निधी मागणी, वितरण आणि नियोजन योग्य पद्धतीने करण्यावर भर देणे.

- प्रती व्यक्ती ३५ रुपयात आहार देणे परवडत नसल्याने या रकमेत वाढ करून कमीत कमी ही रक्कम ५० रुपये/ प्रती व्यक्ती इतकी करण्यात यावी.
- आर्थिक वर्षात राज्य पातळीवरून जिल्हा पातळीवर १०० टक्के निधी सुरुवातीलाच वितरित केला तर निधी वितरणातील विलंब व योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी कमी होतील.
- ज्यांच्या जीवावर या योजनेची अंमलबजावणी होते, त्या अंगणवाडी सेविका व मदतनीसचे मानधन दरमहा देण्यात यावे.
- निधी वितरणातील विलंब टाळण्यासाठी कॅफोमार्फत निधी वितरणाची पद्धत बंद करून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून थेट आहार समितीच्या खात्यावर निधी वर्ग करण्यात यावा.
- सीडीपीओ यांच्या पातळीवर पुरेसा शिल्लक निधी उपलब्ध राहिल्यास ज्या आहार समितीला निधीची आवश्यकता आहे त्यांना लगेच सदर निधी वर्ग करता येईल. जेणेकरून गाव पातळीवर योजना नियमित स्वरूपात चालू राहील.

या सगळ्यातून हे पुढे येते की, अमृत आहार योजनेच्या निधी वितरणामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी असून त्याचा परिणाम अंगणवाडी सेविकांना योजना राबविताना होतो आहे. हा निष्कर्ष आला तो 'सोशल ऑडिट' प्रक्रियेमधून.

आ) गावपातळीवर प्रत्यक्ष राबवण्यात येणाऱ्या योजनेची सद्यःस्थिती समजण्यासाठी...

सोशल ऑडिट प्रक्रिया

अमृत आहार योजना राबवत असताना ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचे निर्देश या योजनेच्या शासन निर्णयात देण्यात आले आहे. या निर्देशाचा आधार घेत गाव पातळीवर या योजनेची सद्यःस्थिती काय आहे? योजनेत ठरवल्याप्रमाणे आहार दिला जातो का? निधी वेळेवर मिळतो का? योजना राबवताना अंगणवाडी सेविकांना काय अडचणी येतात? प्रत्यक्ष लाभार्थ्याला या योजनेचा लाभ कसा मिळतो? हे तपासण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील रायगड, ठाणे आणि गडचिरोली या तिन्ही जिल्ह्यातील अनुक्रमे कर्जत, मुरबाड आणि कोरची या तीन तालुक्यातील प्रत्येकी ३ गावांमध्ये 'सामाजिक ऑडिट प्रक्रिया' राबविण्यात आली. या प्रक्रियेमध्ये देखील **मुरबाड,** ठाणे जिल्ह्यात **'वन-निकेतन'** संस्था; **कोरची,** गडचिरोली जिल्ह्यामधील **'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'** आणि **कर्जत,** रायगड जिल्ह्यातील **'दिशा केंद्र'** यांचा सहयोग घेण्यात आला.

कोणी केले अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट?

कोरची

- कोरची तालुक्यातील १३० गावांपैकी ९० गावात सक्रिय **'ग्रामसभेची महाग्रामसभा'** मार्फत सोशल ऑडिटची प्रक्रिया
- महाग्रामसभेने गावातील ग्रामसभेचे सभासद असलेल्या तरुण युवक-युवतींना घेऊन गाव गटाची बांधणी केली. या गाव गटात किमान दहा सदस्य घेण्यात आले.

मुरबाड

- गेल्या तीस वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या 'वन-निकेतन' तथा 'श्रमिक मुक्ती संघटने'च्या कार्यकर्त्यांचा सक्रिय गट गावातील ग्रामसभेत कार्यरत आहे.
- ग्रामसभेचे सभासद असलेल्या तरुण युवक-युवतींना घेऊन गाव गटाची बांधणी केली. या गाव गटात किमान पाच ते सात सदस्य घेण्यात आले.

कर्जत

- गावामंध्ये गावसभा/गाव बैठक घेत योजनेविषयी जाणीवजागृती व सोशल ऑडिटचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले आणि त्यातूनच
- गावातील प्रमुख व आहार समितीच्या सदस्यांच्या सहभागाने 'सोशल ऑडिट गट' बनवण्यात आले.

सोशल ऑडिट प्रक्रिया करण्यासाठी गटाचे प्रशिक्षण

सोशल ऑडिटसाठी बांधण्यात आलेल्या गटांना तालुकावार एकत्र करून अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट कसे व का करायचे? याबाबत दोन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात पुढील गोष्टींवर भर देण्यात आला.-

- अमृत आहार योजना नक्की काय आहे? योजनेचा हेतू काय आहे? या योजनेचे लाभार्थी कोण आहेत? या योजनेत काय तरतुदी आहेत? योजनेची अंमलबजावणी करण्यासाठीची जबाबदार यंत्रणा काय आहे?
- अमृत आहार योजनेच्या शासकीय माहितीचे संकलन कसे व कोणाकडून करायचे? योजनेची जाणीवजागृती कशी करायची?
- शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून गावगटाला जी माहिती घ्यायची आहे, त्या माहितीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असेल? त्याचे फॉरमॅट समजून सांगणे.
- मिळालेल्या माहितीची पडताळणी कोणी व कशी करायची? पडताळणीचा हेतू काय?

- पडताळणीतून पुढे आलेल्या मुद्द्यांच्या निराकरणासाठी जनसंवादाचे आयोजन आणि पाठपुरावा कसा करायचा?
- निवडलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष सोशल ऑडिट घडवून आणण्यासाठीचे नियोजन करणे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रशिक्षणाचा भाग म्हणून अंगणवाडीला भेट देऊन प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून गटातील सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

असे केले अमृत आहार योजनेच्या माहितीचे संकलन व जाणीवजागृती

- तिन्ही तालुके आदिवासी असल्याने आदिवासी लोकांना त्यांच्या भाषेत व सोप्या पद्धतीने अमृत आहार योजनेची माहिती कळावी आणि त्या माहितीच्या आधारे त्यांनी सोशल ऑडिटच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे, या दृष्टीने पोस्टर बनवून या तिन्ही गावात गावसभा घेऊन लोकांमध्ये जाणीवजागृती करण्यात आली. कार्यकर्ते आणि गटातील लोकांनी गावात बैठकी, गावसभेत, लाभार्थी महिलांसोबत संवाद इत्यादी मार्फत लोकांमध्ये जाणीवजागृती केली.

कोरची तालुक्यात गोंडी ही आदिवासी बोली भाषा बोलली जाते. या दृष्टीने गोंडी भाषेत पोस्टर बनवून या तीनही गावात ग्रामसभेमार्फत गावसभा घेऊन लोकांमध्ये जाणीवजागृती करण्यात आली.

- अमृत आहार योजनेची तपशीलवार माहिती घेण्यासाठी फॉरमॅट तयार करून गावगटांना देण्यात आले. या फॉरमॅटच्या आधारे गाव पातळीवर अंगणवाडी सेविकांकडून माहिती संकलित करण्यात आली. कोणतेही आढेवेढे न घेता अंगणवाडी सेविकांनी माहिती तर दिलीच शिवाय माहिती घेते वेळी त्यांना निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दुरुस्त करण्याची जबाबदारीही त्यांनी घेतली.
- अमृत आहार योजनेच्या लाभार्थ्यांचे रजिस्टर, जमा खर्चाच्या नोंदी, बँकेचे पासबुक, मागणी पत्र, लाभार्थी हजेरी पट, अमृत आहार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, आहार रजिस्टर व लाभार्थ्यांची यादी झेरॉक्स करून घेण्यात आली.
- मे, ऑक्टोबर आणि डिसेंबर २०१९ या तीन महिन्यातील अमृत आहार योजनेचा लाभ घेतलेल्या गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांची यादी, तर ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या रजिस्टरची झेरॉक्स घेण्यात आली. माहितीच्या सत्यतेसाठी त्यावर अंगणवाडी सेविकेची सही व शिक्का घेण्यात आला.
- एप्रिल ते डिसेंबर २०१९ या कालावधीतील अंगणवाडीमधील अमृत आहार समितीच्या बैठकीचा अहवाल, अमृत आहार समिती तपासणी नोंदवहीतील टिपण यांचीही पडताळणीसाठी झेरॉक्स घेण्यात आली.
- सोशल ऑडिट गट व संस्थेचे कार्यकर्ते यांनी सर्वप्रथम संकलित केलेली माहिती आधी स्वतः समजून घेतली. त्यातून पुढे आलेले मुद्दे नोंदवून घेतले. त्यानंतर गावात बैठक घेऊन पडताळणीचे नियोजन केले.



अशी केली पडताळणी

- सामाजिक अंकेक्षणाचा पुढचा आणि महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे मिळालेल्या माहितीची पडताळणी करणे. त्यानुसार लाभार्थ्यांच्या यादीप्रमाणे गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांच्या (लाभार्थ्यांच्या) घरी जाऊन, अंगणवाडी सेविकेने सांगितलेली माहिती गावगटाने पडताळून पाहिली.
- **लाभार्थ्यांबरोबर संवाद चर्चा-** अमृत आहाराची गुणवत्ता कशी असते? आहाराचा दर्जा कसा असतो? शासकीय परिपत्रकात ठरवून दिल्यानुसार आहार नियमित स्वरूपात मिळतो का? (हिरवी भाजी, पोळी/भाकरी, डाळ-भात, अंडी किंवा केळी, शेंगदाणा लाडू, लिंबाची फोड), आहाराविषयी काही तक्रारी आहेत का? अंगणवाडी सेविकेला आहार देताना काय अडचणी येतात? अंगणवाडीला येणाऱ्या अडचणी / निधीबद्दल गावात किंवा ग्रामसभेत चर्चा केली जाते का? अमृत आहार योजनेअंतर्गत अंगणवाडीमध्ये आहार समितीच्या बैठका नियमित होतात का? आदी माहितीची पडताळणी गरोदर स्त्री व स्तन्यादा मातांशी बोलून करण्यात आली.
- **सोबतच ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांच्या पालकांची बैठक** घेऊन बालकांना आठवड्यातून किती दिवस अंडी/केळी दिली जातात? याची पडताळणी केली.
- **अंगणवाडी सेविका आणि आहार समिती सदस्यांबरोबर चर्चा-** निधीचा अभाव, निधी वेळेत न मिळणे यामुळे अमृत आहार देण्यावर काही परिणाम होतोय का? याची माहिती घेण्यासाठी अंगणवाडी सेविका, अमृत आहार समिती सदस्य यांच्याही मुलाखती पडताळणीच्या वेळी घेतल्या.
- **अंगणवाडीमध्ये जाऊन प्रत्यक्ष तपासणी-** अमृत आहार बनविण्याची जागा, शिधा ठेवण्याची जागा, आहार बनविण्याची पद्धत याची तपासणी केली.

ही पडताळणी निरपेक्षपणे व्हावी म्हणून, महाग्रामसभेचे सदस्य, गावगट व संस्थेचे कार्यकर्ते यांनी सर्वप्रथम संकलित केलेली माहिती आधी स्वतः समजून घेतली. त्यातून पुढे आलेले मुद्दे नोंदवून घेतले. त्यानंतर गावात गावसभा घेऊन पडताळणीचे नियोजन केले.

पडताळणीच्या शेवटी अंगणवाडीतून मिळालेली अमृत आहार योजनेची शासकीय माहिती, पडताळणीतून दिसून आलेल्या तफावती, लाभार्थ्यांनी सांगितलेल्या अडचणी, अंगणवाडी सेविकांनी मांडलेल्या अडचणी, नव्याने समोर आलेले मुद्दे यांची नोंद गावगटाने करून ठेवली.

वरवर पाहता सुरळीत चाललेल्या अमृत आहार योजनांच्या अंतरंगात किती समस्या आहेत हे पडताळणीच्या प्रक्रियेतून प्रकर्षाने पुढे आले.

गाव जनसुनवाई

- अमृत आहार योजनेच्या माहितीची प्रत्यक्ष लाभार्थ्यांना भेटून पडताळणी झाल्यावर पडताळणीतून पुढे आलेले मुद्दे सोडविण्यासाठी या तिन्ही गावात ग्रामसभेमार्फत जनसंवाद आयोजित करण्यात आला.
- या जनसंवादात संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित राहतील यासाठी पाठपुरावा करण्यात आला. प्रत्यक्ष जनसंवादाच्या वेळी सादर करायची माहिती व अहवाल तयार करण्यात आले.
- गावातील समस्या व त्याविषयीच्या मागण्या यांचा माहितीफलक कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आला.
- अमृत आहार योजनेची माहिती देऊन पडताळणीतून उपस्थित झालेले मुद्दे या जनसंवादात चर्चिले गेले. जे मुद्दे गाव पातळीवर सुटणारे होते, त्यावर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. तर धोरणात्मक निर्णयांसाठी तालुका व जिल्हा पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली.

गडचिरोली जिल्ह्यातील सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेतून झालेले बदल आणि महत्त्वाचे निर्णय

सोशल ऑडिटच्या पडताळणीतून पुढे आलेले सकारात्मक मुद्दे

- तिन्ही गावात अमृत आहाराची गुणवत्ता चांगली असून आहार शासकीय परिपत्रकात ठरवून दिलेल्या प्रमाणात व अपेक्षेप्रमाणे मिळतो. मात्र ज्या स्त्रिया किंवा बालके अंडी खात नाही त्यांना केळी दिली अशी मागणी गावातून पुढे आली.
- तिन्ही गावात गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना महिन्यातून २५ दिवस तर ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना १६ दिवस अंडी नियमित मिळतात.
- बोडेना गावात मुलांनी अंगणवाडीत जर अंडी खाल्ली नाहीत तर अंडी त्यांच्या डब्यात घालून घरी खाण्यासाठी दिली जातात. तसेच काही गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता अंगणवाडीत येऊन आहार खात नाही त्यामुळे त्यांना घरपोच आहार दिला जातो.

पडताळणीतून आलेल्या मुद्यांबद्दल गाव जनसंवादात झालेले निर्णय

- तिन्ही गावात ग्रामसभेमार्फत अमृत आहार समिती स्थापन झाल्याचा ठराव करून घेणे. आहार समितीच्या नियमित बैठका घेणे.
- तिन्ही गावातील अंगणवाडीत अमृत आहार समितीचे रजिस्टर व चव रजिस्टर तयार करणे. आहार समितीने वेळोवेळी आहाराची गुणवत्ता व चव तपासणे.
- पडियाल जोब गावातील अंगणवाडीला स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी ग्रामसभेचा ठराव घेऊन आदिवासी विकास विभाग व एकात्मिक बाल विकास विभागाला सदर ठराव सादर करणे.
- सर्व गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांनी अंगणवाडीत येऊनच आहार खावा यासाठी बोडेना गावच्या ग्रामसभेत निर्णय घेण्यात आला. या महिला एकत्र आल्यास त्यांना गरोदरपणातील काळजी, बाळाची काळजी, स्तन्यपान, चौरस आहाराचे महत्त्व आदी गोष्टींबद्दल समुपदेशन व मार्गदर्शन करता येईल.
- कुपोषित मुलांसाठी असलेल्या EDNFच्या पाकिटांचा स्टॉक संपवायचा असल्याने आय.सी.डी.एस.मार्फत कोरची तालुक्यातील सर्व गावातील साधारण श्रेणीतील बालकांना पाकिटे देत असल्याचे बोडेना गावगट सदस्यांच्या निदर्शनास आले. गावगटाने ही गोष्ट तालुका बाल विकास अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असता त्यांनी ती पाकिटे न देण्याचे निर्देश अंगणवाडी सेविकांना दिले.

ठाणे जिल्ह्यात दोन्ही प्रक्रियांमधून पुढे आलेल्या समस्या आणि जनसंवादात झालेले महत्त्वाचे निर्णय

गाव पातळीवरील पडताळणीतून पुढे आलेल्या समस्या

- अमृत आहार समिती गठीत झाली असल्याचा ठराव उपलब्ध नसून समितीचे रजिस्टर, आहार तपासणी रजिस्टर व चव रजिस्टर उपलब्ध नाही. आहार समिती सक्रिय नसल्यामुळे समितीच्या बैठका होत नाहीत. अमृत आहाराबद्दलच्या नोंदी व्यवस्थित होत नसल्याचे आढळून आले.
- आहारात भात, डाळ आणि भाजी हे पदार्थ जास्त असतात. चपाती कधी-कधी दिली जाते, एकच चपाती दिली जाते.
- महिला आणि मुलांना आठवड्यातून दोनदा अंडी व दोनदा केळी दिली जातात. (महिलेला सहाही दिवस अंडी/केळी मिळणे अपेक्षित आहे).
- काही वस्तींवर अमृत आहार योजना दिली जात नसल्याचे दिसून आले.
- तिन्ही गावात अमृत आहार समितीबद्दल फारशी माहिती नसल्यामुळे गावात या समितीबद्दल कधी चर्चा झाली नाही. आहार समितीचे हिशोब तपासले गेले नाहीत.
- आहार रजिस्टर नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या सह्या घेतल्या जात नाहीत. तर गावातील इतर पाड्यातील काही गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता आहार घेण्यासाठी अंगणवाडीत नियमित येत नाहीत.

पडताळणीतून आलेल्या मुद्यांबद्दल गाव जनसंवादात झालेले निर्णय

- अमृत आहार समिती स्थापन झाल्याचा ठराव करून घेणे. आहार समितीच्या **नियमित बैठका घेणे.**
- महिलांच्या आहारात भात, डाळ, भाजी, दोन चपात्या, अंडी/केळी, शेंगदाण्याचा लाडू आणि लिंबाची फोड असे दिले जाईल असे ठरवण्यात आले.
- अंगणवाडीत अमृत आहार समितीचे रजिस्टर व चव **रजिस्टर तयार करणे. आहार समितीने वेळोवेळी आहाराची गुणवत्ता व चव तपासणे.**
- **सर्व गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांनी अंगणवाडीत येऊनच आहार खावा यासाठी गावच्या बैठकीत चर्चा करण्याचे ठरले,** या महिला एकत्र आल्यास त्यांना गरोदरपणातील काळजी, बाळाची काळजी, स्तन्यपान, चौरस आहाराचे महत्त्व आदी गोष्टींबद्दल समुपदेशन व मार्गदर्शन करता येईल.

कर्जत तालुक्यात दोन्ही प्रक्रियेमुळे झालेले सकारात्मक बदल

१

रामाचीवाडी येथील अंगणवाडी ३ वर्षांपासून बंद होती परिणामी अमृत आहार योजना बंद होती. लोकसहभागी ऑडिट प्रक्रिये दरम्यान समिती सदस्यांना सदर योजनेविषयी सखोल माहिती दिल्यावर, स्थानिक लोकांनी मंडळ अधिकारी (महसूल विभाग) यांच्याकडे अंगणवाडी सुरू करण्याची मागणी केली. सोबत गाव गट आणि संस्था यांनी तालुका पातळीवरील संबंधित सर्वच अधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यानंतर फेब्रुवारीमध्ये अंगणवाडी सुरू करून व आहार द्यायला सुरुवात झाली आहे.

२

रायगड जिल्ह्यात चालू असलेल्या अमृत आहार योजनेस एकूण ८६.९० (रु. लाखात) निधी जिल्हा अधिकारी (जिल्हा नियोजन समिती सदस्य) रायगड (अलिबाग) यांनी आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या मागणीप्रमाणे २३ मार्च २०२० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासकीय मान्यता देऊन वितरित करण्यास मंजुरी दिली. (मुलाखतींदरम्यान ३१ जानेवारी २०२०, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर गंभीर परिस्थितीची माहिती आणि पत्रव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर आणि स्थानिक संस्थेच्या सततच्या पाठपुराव्यानंतर).

३

ज्या-ज्या गावांमध्ये अंगणवाडी सेविकांचा रिक्त पदांचा मुद्दा होता त्या गावांची माहिती गावगट आणि समितीच्या आधारे संस्थेमार्फत संबंधित जिल्हा आणि तालुका प्रशासनाला लेखी निवेदन देण्यात आले. परिणामी फेब्रुवारी महिन्यात अंगणवाडी सेविकांची भरती प्रक्रिया सुरू करून लोकसहभागी ऑडिट प्रक्रियेतील गावांना प्राधान्य देण्यात आले.

या दोन्ही प्रक्रियांमधून पुढे आलेल्या शिफारसी आणि राज्य स्तरावर बदल करण्यासाठी ठोस सूचना

- योजनेचा निधी मागणी-वितरण यंत्रणा आणखी सुटसुटीत आणि कमी वेळखाऊ करण्याच्या दृष्टीने एक ठोस उपाय म्हणजे गडचिरोलीची निधी वितरणाची नवीन पद्धत! जर ही पद्धती महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत लागू केली तर अमृत आहार योजनेच्या निधी वितरणातील टप्पे व अडथळे कमी होण्यास निश्चितच मदत होईल.
- ज्यांच्या जीवावर या योजनेची अंमलबजावणी होते, त्या अंगणवाडी सेविका व मदतनीसचे मानधन दरमहा देण्यात यावे.
- अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, सीडीपीओ, प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयातील रिक्तपदे तातडीने भरण्यात यावीत.
- अमृत आहार बनविण्यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीसवर ताण पडतो. त्यामुळे त्या त्यांचे इतर नियमित कामे नीट करू शकत नाही. त्यांच्यावरील हा ताण कमी व्हावा म्हणून शासकीय परिपत्रकानुसार ग्रामसभांनी महिला स्वयंपाकीची नेमणूक करावी. किंवा आहार शिजविण्याचे काम महिला बचत गटांना देण्यात यावे.
- प्रती व्यक्ती ३५ रुपयात आहार देणे परवडत नसल्याने या रकमेत वाढ करून कमीत कमी ही रक्कम ५० रुपये/ प्रती व्यक्ती इतकी करण्यात यावी.
- आर्थिक वर्षात राज्य पातळीवरून जिल्हा पातळीवर १०० टक्के निधी सुरुवातीलाच वितरित केला तर निधी वितरणातील विलंब व योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी कमी होतील.
- योजनेच्या अंमलबजावणीसाठी व निधीचा हिशोब चोख ठेवण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे नियमितपणे प्रशिक्षण करत राहणे आवश्यक आहे.
- अमृत आहार समितीमार्फत गाव पातळीवर या योजनेची देखरेख न करता गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व पोषण समितीमार्फत या योजनेची देखरेख केल्यास योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल. यामुळे या समितीच्या मदतीने गाव पातळीवर ग्रामसभेमार्फत येणाऱ्या त्रुटी व अडथळे दूर करण्यास मदत होईल.
- तालुका पातळीवर एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन विभागांमध्ये समन्वयासाठी नियमित बैठका व दोघांच्या मिळून कार्यक्षेत्रात भेटी होणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत.
- अमृत आहार योजनेचे नियमित आणि सातत्याने सोशल ऑडिट होईल असे धोरण आणि व्यवस्था उभी करणे.



- लेखन व संपादन :
डॉ. नितीन जाधव
भाऊसाहेब आहेर
हेमराज पाटील
तृप्ती मालती

Support for Advocacy & Training to Health Initiatives
साथी

- प्रकाशक : साथी
फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस सोसायटी,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८
- फोन : ०२०-२५४७२३२५/२५४७३५६५
- ई-मेल : sathicehat@gmail.com
- वेबसाईट : www.sathicehat.org
- प्रकाशन : जुलै २०२०